# अभियांत्रिकी हरकती, तक्रारी नोंदणीसाठी आज अंतिम मुदत

प्रतिनिधी | नाशिक

अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचा प्रतिसाद यंदा वाढला असून मंगळवार सायंकाळपर्यंत तब्बल एक लाख ९१ हजार १६५ विद्यार्थ्यांनी आपले अर्ज सादर केले आहेत. गेल्यावर्षी एक लाख ६१ हजार ३३६ विद्यार्थ्यांचे अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमासाठी अर्ज आले होते. मंगळवारी (दि. ६) विद्यार्थ्यांना हरकती नोंदणीसाठी अंतिम मुदत असणार आहे.

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून एमएचटी सीईटीचा निकाल जाहीर झाल्यानंतर प्रवेशप्रक्रिया सुरू करण्यात आली. गेल्यावर्षी राज्यातील ३५० महाविद्यालयांत एक लाख ४५ हजार ४८४ जागा उपलब्ध होत्या. त्यापैकी एक लाख १७ हजार ९४८ जागांवर प्रवेश झाले होते. यंदा रिक्त जागांचे प्रमाण आणखी कमी होण्याची शक्यता आहे. अभियांत्रिकी क्षेत्रातील नवे प्रवाह,

## गुरुवारी गुणवत्ता यादी

अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देऊन विद्यार्थ्यांना ३० जुलैपर्यंत संधी देण्यात आली होती. तात्पुरती गुणवत्ता यादी ३ ऑगस्टला जाहीर करण्यात आली. त्यावर विद्यार्थ्यांना ४ ते ६ ऑगस्टपर्यंत सायंकाळी ५ वाजेपर्यंत हरकती व तक्रार नोंदवता येणार आहेत. त्यानंतर ८ ऑगस्ट रोजी अंतिम गुणवत्ता यादी जाहीर करण्यात येणार आहे. ही यादी जाहीर झाल्यानंतर पसंतीक्रम आणि गुणवत्ता फेरींचे वेळापत्रक जाहीर केले जाणार असल्याचे सीईटी कक्षाकडे सांगण्यात आले.

प्रतिसाद वाढत आहे. सायबर सुरक्षा, आयओटी, कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या अभ्यासक्रमांकडे ओढा आहे. त्याचप्रमाणे संगणक अभियांत्रिकी अभ्यासक्रमालाही प्रतिसाद मिळत आहे. त्याचबरोबर यंदा वैद्यकीय, औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया रखडल्यामुळेही अर्ज वाढल्याचे

Divya Marathi 06-08-2024